दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

बीड महाराष्ट्र | सोमवार, 27 जुलै 2026 | अंक क्र. 81 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# लोककल्याणकारी सेवा पंधरवडा : बचत गटातील महिला व फेरीवाल्यांना कर्ज वाटप व नियमित परतफेड करणाऱ्यांचा सन्मान





■ परळी वैजनाथ | प्रतिनिधी.

नगरपरिषद परळी वैजनाथ च्या वतीने आयोजित लोककल्याणकारी सेवा पंधरवडा अंतर्गत आज राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत बचत गटातील महिला व फेरीवाले बांधव यांना कर्ज वाटप, विविध सेवांचे सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महिला सक्षमीकरणाच्या योजनांची नगर परिषदेमार्फत प्रभावी अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न असल्याचे नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मंत्री धनंजय मुंडे आणि पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्तनगर परिषद परळी वैजनाथच्या वतीने सुरू असलेल्या 'लोककल्याणकारी सेवा पंधरवडा' अंतर्गत लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर, परळी वैजनाथ येथे आज रविवार, २६ जुलै रोजी महिला बचत गट तसेच फेरीवाला लाभार्थ्यांना कर्ज वाटपाचा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमास नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी, बांधकाम सभापती प्रा.पवन मुंडे, महिला व बालकल्याण सभापती सौ.अंजली माळी (बनसोडे), नगरसेविका सौ.डॉ.पुजा तोतला, नगरसेवक ॲड. प्रणव मराठे, अनंत इंगळे, डॉ.शालिनी कराड, न.प. उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांच्यासह पं. दीनदयाळ उपाध्याय राष्ट्रीय उपजीविका अभियान विभागाचे सतीश खेबाळे, मीना नेहरकर, किरण वाघमारे, अंबिका परदेशी आदींसह न.प.चे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. महिला सक्षमीकरण, स्वयंरोजगाराला चालना आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सक्षम करण्याचा शासनाचा संकल्प आहे. बचत गटातील महिलांना स्वावलंबनाची नवी दिशा मिळावी, तसेच फेरीवाल्यांच्या व्यवसायाला आर्थिक बळ मिळून त्यांच्या कुटुंबांच्या प्रगतीचा मार्ग सुकर व्हावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. महिला सक्षमीकरणाच्या योजनांची नगर परिषदेमार्फत प्रभावी अंमलबजावणी करण्याचा आपला प्रयत्न असल्याचे नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमात ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त डॉ. शालिनी कराड यांनी गरजू असलेल्या आयटीआय शिकणाऱ्या एका मुलीच्या शैक्षणिक खर्चाची जबादारी घेतली.

## ना.पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून जनहिताचा उपक्रम महिला सक्षमीकरणाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी : नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी

### केक कापून ना.पंकजाताई मुंडे यांचे अभिष्टचिंतन

■ **याप्रसंगी उपस्थित मान्यवर, पदाधिकारी, नगरसेवक, महिला बचत गटांच्या प्रतिनिधी, फेरीवाले बांधव यांच्या उपस्थितीत ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसा निमित्त केक कापून ना.पंकजाताई मुंडे यांचे अभिष्टचिंतन करण्यात आले. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण आणि जनकल्याणाच्या विविध योजनांना अधिक गती मिळत आहे. लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांनी मांडलेला "विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचला पाहिजे" हा विचार आजही पंकजाताई मुंडे यांच्या कार्यातून प्रभावीपणे पुढे नेला जात आहे असे प्रतिपादन नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.**

# आ . सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला मोठे यश ; मतदारसंघात एकूण ९ नवीन एस .टी . बस

## आष्टी आगाराला ४, पाटोदा आगाराला ५ बस; आ. धस यांच्या हस्ते पूजन करून नागरिकांच्या सेवेत दाखल

■ **आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी–पाटोदा–शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार सुरेश (अण्णा) धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले असून, मतदारसंघासाठी एकूण ९ नवीन एस.टी. बस उपलब्ध झाल्या आहेत. यामध्ये आष्टी आगाराला ४ तर पाटोदा आगाराला ५ नवीन एस.टी. बस मिळाल्या आहेत. महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री ना.प्रताप सरनाईक यांच्याकडे आमदार सुरेश धस यांनी सातत्याने पाठपुरावा करून मतदारसंघातील प्रवाशांच्या अडचणी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. त्यानंतर या नवीन बस मंजूर करण्यात आल्या.

या नवीन एस.टी. बसचे आमदार सुरेश धस यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर नागरिकांच्या सेवेसाठी या बसचे स्वागत करण्यात आले. यावेळी उपस्थित नागरिकांनी नव्या बसांचे जल्लोषात स्वागत करत समाधान व्यक्त केले. या बसमुळे आष्टी–पाटोदा–शिरूर मतदारसंघातील विद्यार्थी, शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कामगार तसेच सर्वसामान्य प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि वेळेवर प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे. ग्रामीण भागातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यासही यामुळे मोठी मदत होणार असल्याने सामान्य नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

मतदारसंघातील नागरिकांचा जिव्हाळ्याचा असलेला नवीन एस.टी. बसचा प्रश्न मार्गी लागल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. आमदार सुरेश धस यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे ही मागणी पूर्ण झाल्याने नागरिकांनी त्यांच्याबद्दल समाधान व्यक्त करत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचेही आभार मानले. नवीन बस सेवेत दाखल झाल्याने मतदारसंघातील सार्वजनिक वाहतुकीला नवसंजीवनी मिळाल्याची भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



# कारगिल युद्धातील थरारक अनुभव ऐकून उपस्थितांचे डोळे पाणावले..!

## जय जवान आजी-माजी सैनिक संस्थेकडून कारगिलच्या अमर वीरांना कृतज्ञ अभिवादन ; देशभक्तीने भारावले वातावरण

■ **अंबाजोगाई (प्रतिनिधी)**



देशासाठी जगणे आणि आवश्यक असेल तर देशासाठी हसत-हसत बलिदान देणे, हीच भारतीय सैनिकांची खरी ओळख आहे, या भावनेचा प्रत्यय देणारा २७ वा कारगिल विजय दिन अंबाजोगाई येथील जय जवान आजी-माजी सैनिक संस्थेच्या वतीने अत्यंत उत्साहपूर्ण, भावनिक आणि देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

यावेळी कारगिल युद्धात सर्वोच्च बलिदान देणाऱ्या अमर शहीद वीर जवानांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करीत त्यांच्या शौर्यगाथांना उजाळा देण्यात आला. संस्थेच्या परिसरातील नियोजित स्मारक स्तंभावर संस्थेचे अध्यक्ष कॅप्टन पांडुरंग रघुनाथराव शेप यांच्या हस्ते लष्करी शिस्तीनुसार रीतसर शहीद जवानांच्या स्मृतिप्रीत्यर्थ पुष्पचक्र अर्पण करून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले. उपस्थितांनी भारतमातेच्या वीर सपूतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॅप्टन पांडुरंग शेप होते. तर यावेळी संस्थेचे पदाधिकारी माजी सुभेदार आबासाहेब हाके, बाबासाहेब केंद्रे, भरत पांचाळ, अरविंद तपसे, श्रीमती महानंदा पोखरकर, श्रीमती सिंधु निर्मळ, यशवंत व्हावळे, सर्जेराव शिरसाठ, श्री.पवार, दत्ता साळुंके, भगवान कांबळे, श्री. रत्नपारखी, श्री.गौरशेटे, सूर्यकांत मुंडे, महेश सोळुंके, विजयकुमार तपसे, माणिक काजगुंडे, सुधीर धायगुडे, हमीद भाई, महादेव पतंगे, आकाश जाधव, गोपीनाथ काळे, श्री.कुंडगर, सय्यद ख्वाजा, श्री.थोरात, अंकुश काळे, श्री.लाखे, अनिरूद्ध डाके, भागुजी दोडे, श्री. भोसले, अभिमन्यू लोखंडे, वसंत सावंत तसेच संस्थेतील आजी-माजी सैनिक, महिला भगिनी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमातील सर्वाधिक भावनिक क्षण म्हणजे कारगिल युद्धात प्रत्यक्ष सहभागी झालेल्या माजी सैनिकांनी कथन केलेले अनुभव. हिमालयाच्या बर्फाच्छादित पर्वतरांगांमध्ये उणे तापमानात दिवस-रात्र शत्रूशी दिलेला सामना, सहकाऱ्यांचे बलिदान, रणभूमीवरील संकटांचा सामना आणि विजयासाठी केलेला संघर्ष यांचे त्यांनी अत्यंत जिवंत वर्णन केले. प्रत्येक प्रसंग ऐकताना उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले, तर संपूर्ण परिसरात देशभक्तीचा आणि सैनिकांविषयी अभिमानाचा भाव दाटून आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी सुभेदार आबासाहेब हाके यांनी कारगिल युद्धाची ऐतिहासिक पार्श्वभूमी, युद्धातील महत्त्वाच्या मोहिमा, भारतीय सैन्याचे शौर्य आणि विजयामागील त्याग याविषयी सविस्तर माहिती दिली. कारगिल विजय हा केवळ लष्करी यश नसून भारतीय सैनिकांच्या अदम्य जिद्दी, राष्ट्रनिष्ठा आणि बलिदानाचे सर्वोच्च प्रतीक असल्याचे सुभेदार हाके यांनी सांगितले. तर अध्यक्षीय भाषणात कॅप्टन पांडुरंग रघुनाथराव शेप म्हणाले की, कारगिल युद्ध हे भारताच्या इतिहासातील सुवर्णाक्षरांनी लिहिले गेलेले पर्व आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत भारतीय जवानांनी अद्वितीय धैर्य, पराक्रम आणि शौर्य दाखवत शत्रूला पराभूत केले.

कारगिल विजय दिन हा केवळ विजयाचा उत्सव नसून देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या अमर वीरांना कृतज्ञतेने स्मरण करण्याचा दिवस आहे. देशाचे संरक्षण करणाऱ्या प्रत्येक सैनिकाचा सन्मान करणे ही प्रत्येक भारतीयाची नैतिक जबाबदारी आहे असे कॅप्टन शेप यांनी सांगितले. कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रभक्तीच्या घोषणांनी झाला. उपस्थित सर्वांनी शहीद जवानांच्या स्मृतीप्रती कृतज्ञता व्यक्त करीत त्यांच्या शौर्यगाथा भावी पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रेरक संकल्प केला.

# संपादकीय

## निर्भीड पत्रकार: लोकमान्य टिळक

आकाश जरी कोसळले, तरी मी कोसळणार नाही. त्या कोसळलेल्या आभाळावर उभा राहून ध्येयाकडे वाटचाल करीन," असा विचार ज्यांनी जनमनात रुजवला ते भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील थोर पुढारी, निर्भीड पत्रकार, संपादक, विद्यार्थीप्रिय शिक्षक, प्रतिभावंत लेखक,उत्तम वक्ते म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील सन १८९० ते १९२० हा काळ टिळक युग मानला गेल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वमान्य जनतेवर प्रभाव पडला. टिळक हे जहालवादी असून, इंग्रजांनी भारतास स्वातंत्र्य दिलेच पाहिजे व त्यासाठी त्यांच्याशी असलेले मतभेद उघड करून सर्व जनतेने आंदोलन केले पाहिजे अशी त्यांची विचारधारा होती. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या 'निबंधमाले'पासून तसेच कलकत्ता येथील 'अमृतबझार पत्रिकेचे संपादक शिरीषबाबू घोष यांच्यापासून प्रेरणा घेऊन लोकमान्य टिळक यांनी मराठी व इंग्रजी वृत्तपत्र काढण्याचे ठरवले. दि. २ जानेवारी १८८१ रोजी 'मराठा' हे इंग्रजी व दि. ४ जानेवारी १८८१ रोजी 'केसरी' ही दोन वृत्तपत्रं प्रसिद्ध करून टिळक मराठी पत्रकारितेच्या परंपरेचे पाईक झाले. त्याकाळी ही 'केसरी'(मराठी) व 'मराठा'(इंग्रजी) हे साप्ताहिक स्वरूपात असून ते दर मंगळवारी पुणे येथून प्रसिद्ध होत असे. समाजसुधारक गोपाळ गणेश आगरकर हे १८८१ ते १८८७ या काळात केसरीचे संपादक तर टिळक हे १८८१ ते १९२० या काळात 'मराठा'चे संपादक होते."या पत्रात एरवीच्या वर्तमानपत्राप्रमाणे बातम्या, राजकीय प्रकरण, व्यापारासंबंधी माहिती वगैरे नेहमीचे विषय तर येतीलच पण या खेरीज लोकस्थितीवर निबंध, नवीन ग्रंथावर टीका, वगैरे विषयांचा त्यात समावेश केला जाईल. तसेच विलायतेत ज्या राज्यप्रकरणांची वाटाघाट होते ती इकडील लोकास समजणे अवश्य असल्यामुळे त्याचाही सारांश रूपाने यात संग्रह करण्याचा बेत केला आहे." असा मजकूर 'केसरीच्या' पहिल्या अंकात प्रसिद्ध झाला होता. या निवेदनाप्रमाणे टिळकांनी अखेरपर्यंत लेखन केले.

वर्तमानपत्रकर्ते हे रयतेचे कोतवाल व वकील होत, हीच भूमिका केसरीच्या संपादकांनी अंगी बाळगली. कोल्हापूर गादीच्या प्रकरणात टिळक आणि आगरकर यांना चार महिने तुरुंगवास घडल्याने १८८४ पासून त्यांच्यातील मतभेद विकोपाला गेले आणि दि.२५ ऑक्टोबर १८८७ च्या केसरीच्या अंकात आगरकर यांचा केसरीचा संबंध नसल्याचे जाहीर केले.'केसरी' या वृत्तपत्राचा इतिहास हा केवळ एका वृत्तपत्राचा इतिहास नसून,तो जणू स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास आहे. केसरी या वृत्तपत्राला टिळकांनी जहाल राष्ट्रवादी चळवळीचे मुखपत्र म्हणून एक वेगळा आकार दिला. टिळकांची लेखणी ही निर्भीड व धारदार असून, इंग्रजांविरुद्ध राजकीय प्रबोधांचे एक शस्त्र म्हणून त्यांनी केसरीतून आपली लेखणी चालवली. त्यांची पत्रकारिता ही जणू त्यांच्या राजकीय नेतृत्वाचा एक भाग होती. याची एक आठवण म्हणजे, दि.१५ जून १८९७ रोजी केसरीत 'शिवाजीचे उद्गार' ही कविता प्रसिद्ध झाल्यामुळे टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली सुमारे दीड वर्षं कारावासाची शिक्षा झाली. त्यावेळी साहित्यसम्राट न. चिं. केळकर हे केसरीचे संपादक होते. वास्तविक ती कविता नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी लिहिली असली, तरी त्या लेखनाची जबाबदारी ही टिळकांनी स्वत:कडे घेतली व दि.२४ जून १९०८ रोजी टिळकांना राजद्रोहाच्या आरोपाखाली सहा वर्षांची शिक्षा होऊन त्यांना मंडालेच्या तुरुंगात पाठवले. टिळकांच्या अग्रलेखांचे मथळे हे जणू वाचकांना चक्रवून सोडत असत.'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का'?,'राज्य करणे म्हणजे सूड उगवणे नव्हे','उजाडले पण सूर्य कोठे'?, 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ','गोळी घाला की फाशी द्या','उत्तम गुराखी कोण'? हे त्यांच्या अग्रलेखांचे मथळे केवळ शोभेचे नसून, त्याकाळी ब्रिटिश राज्यकर्त्यांची रेवडी उडवताना सामान्य वाचकांना त्याद्वारे बोध मिळत असे. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' या त्यांच्या गाजलेल्या अग्रलेखाची सुरुवात करताना टिळक लिहितात, "हा प्रश्न पाहून आमचे कित्येक वाचक केसरीकारांचे डोके ठिकाणावर आहे का? असा प्रश्न करतील, आम्ही काय म्हणत आहोत ते नीट ऐकून घेण्याबद्दल त्यास प्रथम विनंती करून नंतर विषयाकडे वळतो' अशा मार्मिक भाषेत ते लेखन करत असत. एखाद्या विषयाचा गांभीर्यपूर्वक अभ्यास करून त्या विषयाचा निकाल लावेपर्यंत टिळक तो विषय सोडत नसत. ज्येष्ठ साहित्यिक वामन मल्हार जोशी यांनी केसरीविषयी असे मत मांडले आहे की,"त्यांच्या (टिळकांच्या) लेखात प्रतीपक्षांना असह्य तेज असे. सांगोपांग विचार, बिनतोड युक्तिवाद, मुद्देसूद व सरल मांडणी, सुबोध व कोटीबाज भाषा अशा गुणांनी ते पुरेपूर भरलेले असायचे. लेख लिहिण्यापूर्वी त्या त्या विषयाची माहिती मिळवण्याबाबत टिळक बराच काळ दवडीत असत" तर 'केसरी'तील टिळकांचे लेखन स्वदेश चळवळीला चांगलेच पूरक ठरत असल्याचे मत त्यांचे सहपत्रकार व 'काळ'कर्ते शि. म. परांजपे यांनी मांडले होते.एखाद्याचा मृत्यूलेख लिहिणे ही संपादकीय लेखनाची कसोटी असते. त्या व्यक्तीशी जरी काही मतभेद असतील तरी, ते त्यावेळी बाजूला सारून त्या व्यक्तीबद्दल टिळक भरभरून लिहीत असत. दि.१७ जून १८९५ रोजी गोपाळ गणेश आगरकर यांचे पुणे येथे निधन झाले. त्यांच्या अंत्यविधीच्या वेळी टिळकांना अश्रू अनावर झाले. आगरकरांची व त्यांची सख्खी मैत्री व घट्ट मतभेद असल्याने टिळकांनी केसरीत आगरकरांवर लिहिलेला मृत्यूलेख वाचून त्याकाळी सामान्य वाचकांना खऱ्या अर्थाने आगरकर यांची महती कळली. आगरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त टिळक त्यांच्यावर दरवर्षी लेख लिहीत असत. तसेच दि. १९ फेब्रुवारी १९१५ रोजी नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांच्या निधनाची बातमी जेव्हा टिळकांना समजली तेव्हा ते सिंहगडावर होते.

# पुरी रथयात्रेत भाविकांसाठी फॉर्च्युन तर्फे 'मिक्स्ड रिॲलिटी-व्हर्च्युअल रिॲलिटी' चे आयोजन

### लाइव्ह किचनच्या माध्यमातून ओडिशामधील खाद्यपदार्थांची चव प्रत्यक्ष भाविकांना अनुभवता आली

**मुंबई/वृत्तसंस्था**

एडब्ल्यूएल ॲग्री बिझनेस लिमिटेडने, आपला प्रमुख ब्रँड फॉर्च्यून च्या माध्यमातून वार्षिक रथयात्रा उत्सवासाठी पुरीमध्ये पुनरागमन केले. संस्कृती, पारंपरिक पाककला, नावीन्य आणि अर्थपूर्ण ग्राहक सहभाग यांना एकत्र आणून, या ब्रँडने भारतातील सर्वात मोठ्या उत्सवांपैकी एक असलेल्या या सोहळ्यादरम्यान भाविक आणि पाहुण्यांना एक अविस्मरणीय अनुभव देण्याची तयारी केली. एक समग्र ब्रँड इकोसिस्टम म्हणून डिझाइन केलेल्या या कार्यक्रमात मिक्स्ड रिॲलिटी (एमआर) आणि व्हर्च्युअल रिॲलिटी (व्हीआर) अनुभव, एआय-सक्षम फोटो बूथ, पाककलेचे प्रात्यक्षिक, उपयुक्तता-आधारित उपक्रम आणि फॉर्च्युन खाद्यतेलाचे जार तसेच पीईटी बाटल्यांसारख्या पॅकेजिंगचा वापर करून बनवलेली रथाची एक प्रतिकात्मक मांडणी यांचा समावेश होता. या संपूर्ण सोहळ्यादरम्यान, फॉर्च्युन सनफ्लॉवर ऑइल केंद्रस्थानी होते; ग्राहकांशी जोडल्या जाणाऱ्या प्रत्येक माध्यमातून, विविध खाद्यपदार्थांमधून आणि कार्यक्रमांमधून ते प्रामुख्याने लोकांपर्यंत पोहोचवले गेले.

मुकेश मिश्रा, विक्री आणि विपणन विभागाचे संयुक्त अध्यक्ष, एडब्ल्यूएल ॲग्री बिझनेस लिमिटेड म्हणाले, "विविध समाजानं एकत्र आणणाऱ्या परंपरा, खाद्यसंस्कृती आणि सांस्कृतिक क्षण साजरे केल्यानेच ग्राहकांशी अत्यंत अर्थपूर्ण नाते निर्माण होते, यावर आमचा विश्वास आहे. लाखो भाविकांसाठी रथयात्रेला अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि फॉर्च्युनच्या माध्यमातून या भव्य उत्सवाचा पुन्हा एकदा भाग होता आल्याचा आम्हाला अभिमान वाटतो. यावर्षी आम्ही एक सर्वसमावेशक अनुभव तयार केला, ज्यामध्ये अन्न, तंत्रज्ञान, संस्कृती आणि भाविकांसाठी उपयुक्त सेवा यांचा मेळ घातला गेला. संस्कृतीशी एकरूप करणारा हा अनुभव देऊन, आम्ही असे अविस्मरणीय क्षण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जे या उत्सवाचा उत्साह दर्शवतात आणि त्याचबरोबर भारतातील घराघरांमध्ये फॉर्च्युनचे विशेष स्थान अधिक दृढ करतात." लाइव्ह किचनच्या माध्यमातून ओडिशामधील खाद्यपदार्थांची




चव प्रत्यक्ष अनुभवता आली. फॉर्च्युनची उत्पादने वापरून आणि फॉर्च्युन सनफ्लॉवर आणि फॉर्च्युन राईस ब्रॅन ऑईलच्या साहाय्याने तयार केलेले काकरा पिठा व सोयाबीन चॉप्स यासारखे पारंपरिक ओडिया पदार्थ पाहुण्यांना खायला मिळाले. महिला प्रेक्षकांना या लाइव्ह किचन उपक्रमात सहभागी होण्याचे निमंत्रण देण्यात आले, ज्यामुळे त्यांना उत्पादनांचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला आणि फॉर्च्युनच्या उत्पादनांची गुणवत्ता तसेच कार्यक्षमता यावरील विश्वास अधिक दृढ झाला. रथयात्रेच्या आठवणी कायमस्वरूपी जपण्यासाठी फॉर्च्युनने पुरी बीचवर एआय (AI) तंत्रज्ञानावर आधारित फोटो बूथ सुविधाही उपलब्ध करून दिली. या इंटरॅक्टिव्ह झोनमध्ये पाहुण्यांना ओडिशाच्या वैशिष्ट्यपूर्ण पार्श्वभूमीवर स्वतःचे फोटो काढता आले.

# विठूमाऊलीच्या जयघोषात नवी मुंबईत रंगली 'स्वच्छता दिंडी'; स्वच्छता आणि जलसंधारणाचा दिला संदेश

**मुंबई/वृत्तसंस्था**

'स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६' अंतर्गत देशभरात राबविल्या जाणाऱ्या 'सफाई अपनाओ – बिमारी भगाओ' अभियानाचा भाग म्हणून नवी मुंबई महानगरपालिका आणि करावे येथील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने एका अभिनव 'स्वच्छता दिंडी' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पारंपरिक आषाढी वारीचे औचित्य साधत काढण्यात आलेल्या या दिंडीत ६५० हून अधिक विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिकांनी पारंपरिक वेशभूषेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचा शुभारंभ संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम म हाराज यांच्या प्रतिमा व पालखीच्या पूजनाने झाला. यावेळी नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, मनपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे, नगरसेविका संतोषी म्हात्रे, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, बेलापूरचे साहाय्यक आयुक्त श्री. प्रशांत नेरकर यांच्यासह ज्ञानदीप संस्थेचे पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

आपल्या भावना व्यक्त करताना महापौर सुजाता पाटील म्हणाल्या की, ज्या शाळेत मी लहानाची मोठी झाले, त्या शाळेच्या दिंडी उपक्रमात नवी मुंबईची प्रथम नागरिक म्हणून सहभागी होता आले, याचा मला मनापासून आनंद आहे. महाराष्ट्राला भक्तीची मोठी परंपरा असून याच भक्तिभावातून या दिंडीच्या माध्यमातून स्वच्छता, आरोग्य, पर्यावरण संरक्षण आणि 'कॅच द रेन' अंतर्गत पावसाळी पाण्याच्या नियोजनाचा संदेश देणे ही कौतुकास्पद बाब आहे. तर आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी, आषाढी एकादशीच्या निमित्ताने लहान मुलांना आपल्या संस्कृतीची व वारीच्या परंपरेची माहिती व्हावी आणि त्यांच्या मनात बालपणापासूनच स्वच्छतेचे संस्कार रुजावे, या उद्देशाने या स्वच्छता दिंडीचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले. आगामी वर्षात परिसरातील विविध शाळांना एकत्र करून हा सोहळा आणखी मोठ्या प्रमाणावर साजरा करण्याचे नियोजन करण्यात येईल, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

'पंढरीनाथ महाराज की जय' आणि 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' अशा विठ्ठल नामाच्या गजरात, टाळ-मृदुंग, लेझीम आणि शालेय बँडच्या तालावर ही दिंडी ज्ञानदीप विद्यालयापासून सीवूड्स येथील नेक्सस मॉलपर्यंत काढण्यात आली. दिंडीत विठ्ठल-रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि संत मुक्ताबाई यांच्या वेशभूषेतील बालवारकरी सर्वांचे आकर्षण ठरले होते. विद्यार्थ्यांनी हातात प्लास्टिक बंदी व स्वच्छता संदेशाचे फलक धरले होते. नेक्सस मॉलच्या पोडियमवर वारीच्या परंपरेनुसार सुंदर रिंगण सोहळा पार पडला. यावेळी इयत्ता सहावीतील विद्यार्थिनी कु. वैष्णवी हाडे हिने 'मला प्लास्टिक नको गं बाई' हे भारूड अत्यंत ढंगदार शैलीत सादर केले. तसेच स्मित शिगवण व सोहम साळुंखे या विद्यार्थ्यांनीही स्वच्छतेवर आधारित भारुडे सादर केली.

हा सोहळा यशस्वी करण्यासाठी स्वच्छता निरीक्षक विजय नाईक, अभियंता वैभव देशमुख आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. 'सफाई अपनाओ, बिमारी भगाओ' अभियानांतर्गत नवी मुंबईत अशाच प्रकारे लोकसहभागातून व्यापक जनजागृती केली आहे.





# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नवीन पनवेल भाजप मंडळाचे रक्तदान शिबिर उत्साहात

**मुंबई/वृत्तसंस्था**

महाराष्ट्राचे कार्यकुशल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त नवीन पनवेल भाजप मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर मोठ्या उत्साहात आणि सामाजिक बांधिलकीच्या भावनेत पार पडले. समाजहिताचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिक आणि भाजप कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने रक्तदान केले.

न्यू पनवेल कर्नाटक संघ हॉल येथे आयोजित या शिबिराला प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील तसेच सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, एकनाथ गायकवाड, समीर ठाकूर, संतोष शेट्टी, शशिकांत शेळके, नगरसेविका कविता चौतमोल, सीता पाटील, राजेश्री वावेकर, डॉ. अस्मिता घरत, कुसुम पाटील, ॲड. शिवानी घरत, नवीन पनवेल शहर मंडळाचे सरचिटणीस प्रशांत फुलपागार, जगदीश घरत, पंकज घाडी, आरपीआयचे प्रभाकर कांबळे, नवीन पनवेल शहर मंडल युवा मोर्चा अध्यक्ष मयूर कदम, उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चा सरचिटणीस अक्षय सिंग, प्रभाग १५ अध्यक्ष संजय कांबळे, प्रभाग १६ अध्यक्ष शिवाजी भगत तसेच प्रभाग १७ अध्यक्ष विजय म्हात्रे उपस्थित होते. यावेळी आयोजक नवीन पनवेल भाजप मंडळाचे अध्यक्ष तथा नगरसेवक दशरथ म्हात्रे यांनी सर्वांचे स्वागत व आभार मानले.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली राज्यभर राबविण्यात येणाऱ्या समाजोपयोगी उपक्रमांचे कौतुक करत रक्तदान हे सर्वोत्तम दान असून गरजू रुग्णांसाठी जीवनदायी ठरत असल्याचे सांगितले. वाढदिवसाचे औचित्य साधून सामाजिक उत्तरदायित्व जपणाऱ्या अशा उपक्रमांचे आयोजन महत्वपूर्ण असल्याचे दशरथ म्हात्रे यांनी म्हंटले. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. उपस्थित मान्यवरांनी रक्तदात्यांचे अभिनंदन करून त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

# मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड ॲण्ड कॉमर्सचा 'उद्योगरत्न' पुरस्कार वैजनाथअप्पा कोल्हे यांना प्रदान

### संघर्ष, प्रामाणिकपणा, ग्राहकनिष्ठा आणि समाजसेवेचा झाला गौरव

**परळी वैजनाथ/ प्रतिनिधी**

मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड ॲण्ड कॉमर्स व नांदेड जिल्हा आडत व्यापारी असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 29 व्या वर्धापन दिन सोहळा व मराठवाडा व्यापारी परिषद कार्यक्रमात परळी वैजनाथ येथील यशस्वी उद्योजक श्री वैजनाथअप्पा लक्ष्मणअप्पा कोल्हे यांना प्रतिष्ठेचा 'उद्योगरत्न' पुरस्कार आज रविवारी थाटामाटात प्रदान करण्यात आला.

या मानाच्या सोहळ्यास मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड ॲण्ड कॉमर्सचे अध्यक्ष श्री आदेशपालजी छाबडा अध्यक्षस्थानी उपस्थित होते. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चर, मुंबईचे अध्यक्ष श्री रविंद्रजी मानगणावे, उपाध्यक्ष श्री सुनीलजी किर्दक, सर्वोच्च न्यायालयाचे विधिज्ञ श्री राहुलजी हिंगमिरे तसेच गोडावरी अर्बन मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या अध्यक्षा सौ. राजश्रीताई हेमंत पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमास विविध व्यापारी महासंघाचे अध्यक्ष माऊली फड, उद्योजक संदीपसेठ लाहोटी, सोनार समाजाचे नेते सुरेश टाक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य सुरेशराव मुंडे, ओबीसी महासंघाचे अध्यक्ष विलासराव ताटे, रमाकांतअप्पा निर्मळे यांच्यासह परळी शहरातील शेकडो व्यापारी, नागरिक, समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून केवळ कष्ट, जिद्द, प्रामाणिकपणा आणि ग्राहकांप्रती असलेल्या निष्ठेच्या बळावर उभारलेले 'शिवम् सुपर मार्केट' आज परळी




वैजनाथ शहरातील विश्वासार्ह व्यावसायिक संस्थांपैकी एक म्हणून ओळखले जाते. बालवयातच कुटुंबाची जबाबदारी स्वीकारत किराणा व्यवसायातील तब्बल 16 वर्षांचा अनुभव घेतल्यानंतर श्री कोल्हे यांनी 1996 मध्ये छोट्या स्वरूपात व्यवसायाची सुरुवात केली. त्यानंतर 2008 मध्ये 'शिवम् सुपर शॉपी' आणि 2025 मध्ये अत्याधुनिक 'शिवम् सुपर मार्केट' उभारून त्यांनी उद्योजकतेचा प्रेरणादायी आदर्श निर्माण केला. प्रभू श्री वैद्यनाथ भगवान व श्री तिरुपती बालाजी यांच्यावरील त्यांची निस्सीम श्रद्धा आणि निस्वार्थ सेवाभावामुळे समाजात त्यांना विशेष मानाचे स्थान प्राप्त झाले आहे. या पुरस्कारामुळे त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाला, ग्राहकनिष्ठेला, सामाजिक बांधिलकीला आणि उद्योजकीय कार्याला राज्यस्तरीय गौरव प्राप्त झाला असून परळी शहराच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांनी श्री वैजनाथअप्पा कोल्हे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# नीट परीक्षेतील कमी गुणांचे टेन्शन; परळीतील १८ वर्षीय विद्यार्थी बेपत्ता, वडिलांची पोलिसांत तक्रार

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

देशभर चर्चेत असलेल्या नीट परीक्षेनंतर विद्यार्थ्यांवरील मानसिक तणावाचे आणखी एक चिंताजनक उदाहरण परळी वैजनाथ येथे समोर आले आहे. नीट परीक्षेत अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याने मानसिक तणावाखाली असलेला १८ वर्षीय विद्यार्थी आदित्य भगवान राठोड हा घरातून निघून गेल्याची घटना घडली असून, त्याचा अद्याप कोणताही ठावठिकाणा लागलेला नाही.



याप्रकरणी आदित्यचे वडील भगवान राठोड यांनी परळी शहर पोलीस ठाण्यात मुलगा बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी बेपत्ता झाल्याची नोंद करून विद्यार्थ्याचा शोध सुरू केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आदित्यने नीट परीक्षेची चांगली तयारी केली होती. मात्र निकालात अपेक्षेपेक्षा कमी गुण मिळाल्याने तो निराश आणि मानसिक तणावाखाली होता. १७ जुलैच्या रात्री तो घरातून बाहेर पडला. त्यानंतर त्याच्याशी कोणताही संपर्क झालेला नसून, त्याचा मोबाईलही बंद असल्याची माहिती आहे. कुटुंबीयांनी परळी शहरासह नातेवाईक, मित्रपरिवार तसेच लातूर परिसरात त्याचा शोध घेतला. मात्र अद्याप त्याचा कोणताही मागमूस लागलेला नाही. त्यामुळे कुटुंबीयांची चिंता वाढली असून, नागरिकांनीही शोधकार्यात सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा तपास सुरू केला असून, आदित्यबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ परळी शहर पोलीस ठाण्याशी किंवा त्याच्या कुटुंबीयांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# 'एक पेड पंकजाताई के नाम' उपक्रमातून तालुकाभर वृक्षारोपण; राजेश गित्ते यांच्या सहपरिवाराने दिल्या वाढदिवसाच्या शुभेच्छा

## परळी तालुका भाजपाच्या सामाजिक उपक्रमांचा वृक्षारोपणाने समारोप; रक्तदान, अन्नदान, स्वच्छता, साहित्य वाटप ते वृक्षारोपण




**परळी (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री मा. ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त परळी तालुका भारतीय जनता पक्षाच्या वतीने राबविण्यात आलेल्या विविध समाजोपयोगी उपक्रमांचा समारोप 'एक पेड पंकजाताई के नाम' या वृक्षारोपण अभियानाने करण्यात आला.

तालुक्यातील प्रत्येक गाव आणि बूथवर वृक्षारोपण करून पंकजाताई यांना अनोख्या पद्धतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. परळी तालुका भाजपाध्यक्ष राजेश गित्ते यांनी सहपरिवार वृक्षारोपण करून या अभियानाची सांगता केली. यावेळी त्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पंकजाताई मुंडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा अर्पण केल्या.

पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त २२ ते २६ जुलै या कालावधीत परळी तालुका भाजपाच्या वतीने रक्तदान शिबिर, निराधारांना अन्न वाटप, स्वच्छता मोहीम, शैक्षणिक साहित्य वितरण तसेच वारकरी बांधवांना खिचडी वाटप असे विविध समाजहिताचे उपक्रम राबविण्यात आले. या सर्व उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

'एक पेड पंकजाताई के नाम' अभियानांतर्गत नंदनंज, मांडवा, लोणी, मालेवाडी, ब्रह्मवाडी, बेलंबा यांसह तालुक्यातील विविध गावांमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. या उपक्रमात तालुका उपाध्यक्ष भरतराव सोनवणे, सुंदर मुंडे, तालुका कोषाध्यक्ष भुराज बदने, तालुका सचिव अनिल गुट्टे, नंदनंजचे सरपंच सुनील गुट्टे, बूथ प्रमुख मेजर बालाजी गित्ते, बालाजी गुट्टे, बीएलए-२ नारायण गुट्टे, केशव गित्ते तसेच गावातील ज्येष्ठ नागरिक, युवक व भाजप कार्यकर्त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. उपक्रमाच्या समारोपावेळी तालुका भाजपाध्यक्ष राजेश गित्ते यांनी सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांचे सहकार्याबद्दल आभार मानले. तसेच लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांना निरोगी, दीर्घ आणि शतायुषी आयुष्य लाभावे, अशी प्रार्थना प्रभू वैद्यनाथ चरणी केली.



# अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी समिती, भीमनगर कार्यकारी मंडळ जाहीर

## मोर्चाला हजारोंच्या संख्येने उपस्थित राहणार

**परळी प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनुसूचित जाती समुदायांमध्ये उपवर्गीकरणाच्या नावावर भांडणे लावून अनुसूचित जाती च्या 59 एकसंघ जातींना आपापसात लढायला लावण्याचे षडयंत्र आरएसएस च्या माध्यमातून रचले असून हा डाव उलथून लावण्यासाठी सबंध महाराष्ट्रामध्ये आरक्षण उपविवर्गकरणाच्या विरोधामध्ये मोर्चे आंदोलने धरणे कार्यक्रम चालू असून परळी मध्ये येत्या 10 ऑगस्ट रोजी सन्माननीय सरसेनानी आनंदराज आंबेडकर व चर्मकार समाजाचे नेते सन्माननीय बबनराव घोलप यांच्या नेतृत्वामध्ये महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. हा मोर्चा प्रचंड यशस्वी करण्यासाठी काल दि. 26 /07/ 2026 रविवार रोजी सकाळी 11 वा. भीमनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात प्रा. डॉ.विनोद जगतकर यांच्या अध्यक्षतेखाली भीमनगर येथील नागरिकांची बैठक मोठ्या उत्साहात संपन्न झाली.( पहिल्याच बैठकीत 50 हजार रुपये देणगी जमा ) यावेळी सदर मोर्चाचे सविस्तर नियोजन करण्यात आले व काही ठराव मंजूर करण्यात आले. याप्रसंगी अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी समिती, भीमनगर कार्यकारी मंडळाची खालील प्रमाणे स्थापना करण्यात आली. प्रा. डॉ.विनोद जगतकर वैजनाथराव जगतकर प्रा. विलास रोडे सोपान ताटे शंकर साळवे अनिल मस्के बालासाहेब जगतकर अॅड.संजय रोडे नितीन रोडे भारत ताटे रणवीर चक्रे अशोक जगतकर प्रा.संघपाल समुद्रे वसंत बनसोडे सिद्धार्थ जगतकर मिलिंद बनसोडे अशोक रोडे भैय्यासाहेब आदोडे मिथुन रोडे राम आदोडे प्रताप समिंदरसवळे सतपाल जगतकर नवनाथ दाणे दीपक शिरसाट जतीन जगतकर विलास आदोडे महेंद्र अशोक ताटे आनंद जगतकर. भानुदास जंगले राहुल ताटे राजाभाऊ शिवाजी जगतकर . संदीप ताटे महिला प्रतिनिधी . सौ. अनिता विलास रोडे सौ.गवळणबाई रामभाऊ गोखले आदींची निवड करण्यात आली. यावेळी भीमनगर येथील युवक प्रेम जगतकर,संदेश आदोडे, आदि मोठ्या संख्येने बैठकीस उपस्थित होते.



# ना. पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस परळीत विविध सामाजिक सेवा उपक्रमांनी उत्साहात साजरा

**परळी वैजनाथ**

महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा लोकप्रिय लोकनेत्या मा. ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार (दि. 26) रोजी परळी शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने दिवसभर विविध सामाजिक, धार्मिक व जनहिताचे उपक्रम राबवून वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात भाजपा पदाधिकाऱ्यांच्या वतीने ना. पंकजाताई मुंडे यांच्या दीर्घायुष्यासाठी बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री प्रभू वैद्यनाथास महाअभिषेकाने झाली. मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त विजयकुमार खोसे यांच्या तर्फे श्री प्रभू वैद्यनाथास अभिषेक जलपात्र अर्पण करून राज्याच्या प्रगतीसह जनतेच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली.

यानंतर माजी नगराध्यक्ष वैजनाथ तात्या जगतकर यांच्या वतीने भीमनगर येथील सुगंधकुटी बुद्धविहार येथे बुद्ध वंदना घेण्यात आली, भाजप जेष्ठ नेते खालेद राज व खदीर भाई यांच्या वतीने हुसेन शहावली दर्ग्यावर चादर अर्पण करण्यात आली, परळी उपजिल्हा रुग्णालयात नितीन समशेट्टे यांच्या वतीने रुग्णालयातील रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले, प्रितेश तोतला यांच्या वतीने आर्यसमाज येथे होम-हवन व गुरुकुलातील विद्यार्थ्यांना भोजन देण्यात आले, महिला व बालकल्याण सभापती अंजलीताई माळी लोखंडे यांच्या वतीने अन्नपूर्णादेवीस महाआरती व प्रसाद वितरण करण्यात आले, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत बांधकाम सभापती पवन मुंडे व नगरसेविका डॉ पुजाताई तोतला यांच्या वतीने प्रभाग क्र 13 मधील नागरिकांना पर्यावरणपूरक कापडी पिशवी व वृक्ष वाटप करण्यात आले. नागसेन नगर येथील समाज मंदिरास भाजयुमो चे मा.जिल्हा अध्यक्ष नीलकंठ चाटे यांच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची भव्य प्रतिमा भेट देण्यात आली असे विविध उपक्रम राबविण्यात आले.

याशिवाय पावसाळ्यात पहाटेपासून वृत्तपत्र वितरणाचे काम करणाऱ्या वृत्तपत्र वितरकांच्या सेवेला सलाम म्हणून त्यांना पावसापासून संरक्षणासाठी भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांच्या वतीने रेनकोटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात आले.

या सर्व कार्यक्रमांना भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, प्रमुख पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, बूथ प्रमुख, विविध आघाड्यांचे कार्यकर्ते तसेच संस्थांचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## लोकार्थ




# मणिपाल हेल्थ एंटरप्रायझेसचा आय पी ओ 29 जुलै रोजी उघडणार

मणिपाल हेल्थ एंटरप्रायझेस लिमिटेडने आपल्या पहिल्या समभाग विक्रीसाठी (आयपीओ) २/- दर्शनी मूल्य असलेल्या प्रति इक्विटी शेअरचा किंमतपट्टा ५६०/- ते ५९०/- निश्चित केला आहे.कंपनीचा हा आयपीओ सबस्क्रिप्शनसाठी बुधवार, २९जुलै२०२६रोजी उघडेल आणि शुक्रवार, ३१ जुलै २०२६ रोजी बंद होईल. गुंतवणूकदार किमान २५ इक्विटी शेअर्ससाठी आणि त्यानंतर२५च्या पटीत बोली लावू शकतात.आजच्या प्रत्येकी इक्विटी शेअर्स २ चे १,१७९,७५७,३२१ इक्विटी शेअर्स आऊट स्टॅंडिंग आहेत.या आयपीओ मध्ये ₹,००० कोटीं यंतचा वीन इश्यू आणि प्रवर्तक - 'इम्पेरियस हेल्थ केअर इन्व्हेस्टमेंट्स पीटीई लिमिटेड' आणि 'मणिपाल एज्युकेशन अँड मेडिकल ग्रुप इंडिया प्रायव्हेट लिमिटेड' द्वारे २,१६,१३,८३४ इक्विटी शेअर्सची विक्री ऑफर समाविष्ट आहे.भाग विक्री करणाऱ्या इतर गुंतवणूकदारांमध्ये टी पी जी एस जी माग्झीन, सेवेंती सेकंड इंवेस्त्मेंट कंपनीएल एल एल सी , यांचा समावेश आहे.नवीन इश्यूद्वारे प्राप्त होणाऱ्या ५,५५२.८ कोटींपैकीकाही थकबाकी कर्जांची व त्यावरील व्याजाची पूर्ण किंवा अंशतः परतफेड/पूर्व पेमेंट करण्यासाठी वापर केला जाईल, जे कर्ज कंपनीची प्रमुख उपकंपनी 'मणिपाल हॉस्पिटल्स प्रायव्हेट लिमिटेड' हिने घेतले आहे.५७४ कोटी हे कंपनीची स्टेप-डाऊन उपकंपनी 'सह्याद्री हॉस्पिटल्स प्रायव्हेट लिमिटेड' मधील अल्पसंख्याक भागभांडवल अधिग्रहित करण्यासाठी वापरले जातील.

# बजाज फिनसर्व्ह स्मॉल कॅप फंड'ची वर्षपूर्ती

बजाज फिनसर्व्ह म्युच्युअल फंडाने 'बजाज फिनसर्व्ह स्मॉल कॅप फंड'चा पहिला वर्धापन दिन साजरा केला. ही एक 'ओपन-एंडेड इक्विटी स्कीम' आहे जी प्रामुख्याने स्मॉल कॅप शेअर्समध्ये गुंतवणूक करते आणि यासाठी 'ग्रोथ' (वाढ), 'व्हॅल्यू' (मूल्य) व 'क्वालिटी' (गुणवत्ता) अशा शेअर्सवर लक्ष केंद्रित करणारी अद्वितीय '३-इन-१' रणनीती वापरते. १८ जुलै २०२५ रोजी लॉंच झाल्यापासून, या फंडाने ८.५% परतावा दिला आहे; तर याच कालावधीत याचा बेंचमार्क असलेल्या 'BSE 250 SmallCap TRI' ने -१.२५% परतावा दिला. यामुळे ९.७५ टक्के पॉइंट्सचा 'अल्फा' (बेंचमार्कपेक्षा अधिक परतावा) प्राप्त झाला आहे.स्मॉल कॅप क्षेत्रासाठी अस्थिर ठरलेल्या या वर्षातही फंडाने आपल्या मूळ उद्दिष्टाशी प्रामाणिक राहून काम केले आहे. सुरुवातीपासून स्मॉल कॅपमध्ये सरासरी ८५% गुंतवणूक कायम राखतानाच लार्ज कॅपमध्ये शून्य गुंतवणूक ठेवली आहे. ३० जून २०२६ पर्यंत, पोर्टफोलिओमध्ये स्मॉल कॅप्सचा वाटा ८७.३४% होता, तर उर्वरित गुंतवणूक मिड-कॅप्स आणि रोख समतुल्य (कॅश इक्विव्हलंट्स) साधनांमध्ये होती.




# मिलिटरी-ग्रेड टिकाऊपणासह iQOO Z11 लाईट विद्यार्थ्यांसाठी लॉन्च

उच्च-कार्यक्षमतेचा स्मार्टफोन ब्रँड iQOO, iQOO Z11 Lite लॉन्च झालेला आहे. ऑनलाइन लेक्चर्सना उपस्थित राहणाऱ्या, असाइनमेंट्स आणि नोट्स घेण्यासाठी एआयचा वापर करणाऱ्या, दररोज मल्टीटास्क करणाऱ्या आणि घराबाहेरच्या वापरासाठी चमकदार डिस्प्ले असलेल्या टिकाऊ स्मार्टफोनची गरज असलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी डिझाइन केलेला, iQOO Z11 Lite एआय-सक्षम उत्पादकतेला स्टायलिश डिझाइनसोबत जोडतो. नवीनतम OriginOS 6 आणि ४ वर्षांच्या सुरक्षा अपडेट्ससह, हे डिव्हाइस 'नॉन-स्टॉप. नो लिमिट.' या तत्त्वावर आधारित आहे.

iQOO Z11 Lite शिकणे, निर्मिती करणे आणि संवाद साधणे अधिक कार्यक्षम बनवण्यासाठी ए आय वैशिष्ट्यांचा एक शक्तिशाली संच एकत्र आणते. या अनुभवाच्या केंद्रस्थानी ए आय क्रिएशन आहे, जे विद्यार्थ्यांना लांबलचक दस्तऐवजांचा सारांश तयार करण्यास, असाइनमेंट्स सुधारण्यास, मजकूर तयार करण्यास, मजकुराचे भाषांतर करण्यास, कल्पनांवर विचारमंथन करण्यास आणि लेखनातील अडथळ्यावर सहजतेने मात करण्यास मदत करते.

बातमी -४]आरआयआर पॉवर इलेक्ट्रॉनिक्सची सूचीकरणाची घोषणा उच्च-शक्तीच्या सेमीकंडक्टर उपकरणांच्या आणि पॉवर इलेक्ट्रॉनिक्स सोल्यूशन्सच्या भारतातील अग्रगण्य उत्पादकांपैकी एक असलेल्या आरआयआर पॉवर इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडला, तिच्या सिक्युरिटीजच्या सूचीकरण आणि व्यापारासाठी एक्सचेंजकडून आवश्यक मंजुरी मिळाल्यानंतर, गुरुवार, १६ जुलै, २०२६ पासून नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड (एनएसई) वर सूचीबद्ध होण्याची घोषणा करताना आनंद होत आहे. ही कंपनी १९८६ पासून बीएसई लिमिटेड (बीएसई) वर सूचीबद्ध आहे, जे भारतातील भांडवली बाजारातील तिचे दीर्घकाळचे अस्तित्व दर्शवते. एनएसईवरील सूचीकरण हे कंपनीच्या व्यावसायिक प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे आणि यामुळे स्टॉकची तरलता वाढेल, किंमत निश्चिती सुधारेल आणि संस्थात्मक व किरकोळ गुंतवणूकदारांच्या विविध वर्गापर्यंत पोहोचण्याचा मार्ग व्यापक होईल अशी अपेक्षा आहे.

या महत्त्वाच्या टप्प्यावर भाष्य करताना, आरआयआर पॉवर इलेक्ट्रॉनिक्स लि.चे नॉन-एक्झिक्युटिव्ह चेअरमन, डॉ. हर्षद मेहता म्हणाले: "आरआयआर पॉवर इलेक्ट्रॉनिक्सची नॅशनल स्टॉक एक्सचेंजवरील प्रस्तावित सूचीकरण हे आमच्या विकासाच्या प्रवासातील एक महत्त्वाचे पर्व आहे. हे आमच्या भागधारकांनी आमच्यावर ठेवलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे आणि आमचे कर्मचारी, ग्राहक, भागीदार व सर्व हितधारकांच्या समर्पणाची पोचपावती देते"

**संकलन –संयोजन सुबोध रणशेवरे**



दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
बीड, सोमवार, 27 जुलै 2026
Last page

# आष्टीत आरोग्यसेवेचा महायज्ञ; मुख्यमंत्री महाआरोग्य शिबिराच्या नियोजनाला वेग

## आमदार सुरेश धस, रामेश्वरभाऊ नाईक; यांच्या उपस्थितीत प्रशासनाची पूर्वनियोजन बैठक

**आष्टी (प्रतिनिधी)**

राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त दि. ६ ऑगस्ट रोजी आष्टी येथील अनिषा ग्लोबल स्कूल येथे आष्टी–पाटोदा–शिरूर विधानसभा मतदारसंघातील नागरिकांसाठी आयोजित करण्यात आलेल्या मुख्यमंत्री मोफत महाआरोग्य शिबिराच्या पूर्वनियोजनाचा आढावा घेण्यासाठी आज प्रशासनासोबत महत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

या बैठकीस मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष, महाराष्ट्र राज्याचे प्रमुख रामेश्वर भाऊ नाईक तसेच आष्टी–पाटोदा–शिरूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा शिबिराचे आयोजक सुरेश (अण्णा) धस प्रमुख उपस्थित होते. बैठकीत शिबिराचे नियोजन, रुग्णांची तपासणी, उपचार व्यवस्था, वाहतूक, समन्वय आणि विविध विभागांच्या जबाबदाऱ्यांबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

यावेळी आमदार सुरेश धस यांनी रुग्णांना कोणताही त्रास होणार नाही, यासाठी तपासणी प्रक्रिया अधिक सहज, सुलभ आणि वेगवान करण्याच्या सूचना दिल्या. मतदारसंघातील प्रत्येक गावातील नागरिकांना त्यांच्या परिसरातील किंवा जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक तपासणी करून त्यानंतर पुढील उपचारासाठी आष्टी येथे आणण्याबाबत नियोजन करण्यात आले.



बैठकीत महिलांमध्ये विशेषतः गर्भाशयाच्या आजारांचे वाढते प्रमाण, ग्रामीण भागातील व ऊसतोड मजूर महिलांच्या आरोग्य समस्या, तसेच गुडघेदुखी, कॅन्सर आणि हृदयविकार यांसारख्या गंभीर आजारांवर विशेष लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. या शिबिराच्या माध्यमातून अधिकाधिक रुग्णांची तपासणी, निदान, उपचार तसेच पुढील शस्त्रक्रिया व विशेष उपचारासाठी आवश्यक ते मार्गदर्शन आणि सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

आष्टी–पाटोदा–शिरूर मतदारसंघातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांवर प्राथमिक तपासणी सुरू करण्यात आली असून तपासणी झालेल्या रुग्णांची अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांच्या साहाय्याने दि. ६ ऑगस्ट रोजी आष्टी येथे पुढील तपासणी व आवश्यक उपचार करण्यात येणार आहेत. या मोफत महाआरोग्य शिबिराचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले.

बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी समन्वयक स्वानंद सोनार, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक चव्हाण, जिल्हा आरोग्य अधिकारी गंडाळ, जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर,उपविभागीय अधिकारी वसिमा शेख, तहसीलदार वैशाली पाटील, तहसीलदार निल्लेवाड, वैद्यकीय अधीक्षक रामदास मोराळे,तालुका आरोग्य अधिकारी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे कर्मचारी, विविध विभागांचे डॉक्टर तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

---

# SIR मोहिमेत समीर शेख यांचे उल्लेखनीय योगदान; ९५० ऑफलाइन अर्ज भरून जमा

## शिवरायांच्या मावळ्याने दाखवली जनसेवेची तळमळ; सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत घरोघरी जाऊन भरले अर्ज

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**

आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण येथे सुरू असलेल्या SIR (Special Identification Registration) मोहिमेत शिवरायांचा मावळा व सामाजिक कार्यकर्ते समीर शेख यांनी उल्लेखनीय कार्य करत सुमारे ९५० ऑफलाइन अर्ज भरून ते संबंधित BLO बाळासाहेब पोटे यांच्याकडे जमा केले आहेत.

या मोहिमेचे मार्गदर्शन आ. सुरेश आण्णा धस, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख, तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील व गटविकास अधिकारी प्रयाग ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत आहे.

"SIR प्रक्रियेपासून कोणताही नागरिक वंचित राहू नये" हा उद्देश समोर ठेवून समीर शेख यांनी सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत आपल्या दुचाकीवरून गावातील प्रत्येक वस्ती व घराघरात जाऊन नागरिकांचे



ऑफलाइन अर्ज भरून घेतले. भरलेले सर्व अर्ज त्यांनी वेळेवर BLO बाळासाहेब पोटे यांच्याकडे जमा केले.

विशेष म्हणजे, हे सर्व कार्य त्यांनी कोणतेही मानधन न घेता, केवळ सामाजिक बांधिलकी आणि जनसेवेच्या भावनेतून केले. त्यांचा हा निःस्वार्थीपणा व समर्पित वृत्ती ग्रामस्थांनी विशेष करून लक्षात घेतला. समीर शेख हे नेहमीच सामाजिक कार्यात सक्रिय असून, त्यांच्या या सेवेमुळे सांगवी पाटणसह परिसरातून त्यांचे मोठ्या प्रमाणात कौतुक होत आहे. नागरिकांनीही त्यांच्या कार्याचे स्वागत करत अभिनंदन केले आहे. या कार्यामुळे अनेक नागरिकांचे अर्ज वेळेत पूर्ण होऊ शकले,

ज्यामुळे त्यांची सोय झाली. ग्रामस्थांच्या मते, "समीर शेख यांनी खऱ्या अर्थाने सेवेचा आदर्श घालून दिला आहे. त्यांच्या या पाठोपाठ इतर तरुणांनीही पुढे यावे," अशी भावना व्यक्त करण्यात आली.

---

# इंडियन मेडिकल असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य उपाध्यक्षपदी डॉ.राजेश इंगोले यांची बिनविरोध निवड

**अंबाजोगाई (प्रतिनिधी)**

इंडियन मेडिकल असोसिएशनच्या राज्य कार्यकारिणीच्या निवडणुका जाहीर झालेल्या आहेत. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या या अत्यंत प्रतिष्ठेच्या पदाच्या लढतीमध्ये राज्य उपाध्यक्ष पदासाठी इंडियन मेडिकल असोसिएशनचे सांस्कृतिक समितीचे चेअरमन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची बिनविरोध निवड झाली आहे.

मागील तीन वर्षांपासून इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक विभागाचे धुरा समर्थपणे आपल्या खांद्यावर एकहाती घेत इंडियन मेडिकल असोसिएशनच्या सांस्कृतिक कार्यक्रमांना व सांस्कृतिक समितीला आपल्या कार्य कर्तुत्वाने एका वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या तसेच डॉक्टरांवरील अन्यायाविरोधात विविध प्रश्नांविरोधात सतत आवाज उठवणारे आय.एम.ए चे सांस्कृतिक समिती अध्यक्ष अंबाजोगाईची बुलंद तोफ डॉ.राजेश इंगोले यांचे नांव महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यात, इंडियन मेडिकल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांमध्ये व सदस्यांच्या तोंडी आहे.



परंतु, या निवडणूकितून इतर उमेदवारानी त्यांचे नामनिर्देशन परत घेतल्याने डॉ.राजेश इंगोले यांची महाराष्ट्र राज्याच्या उपाध्यक्षपदी बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.राजेंद्र कुलकर्णी यांनी घोषित केले.

या निवडीमुळे डॉराजेश इंगोले यांचा इंडियन मेडिकल असोसिएशन संघटनेतील कार्य सर्वमान्य असल्याचे मत अनेक मान्यवर डॉक्टर्सनी व्यक्त केले. आपल्याला मिळालेल्या पदाला न्याय देऊन झोकून काम करीत राहणे आणि त्या पदाला वेगळ्या उंचीवर नेणे आणि पदाचा उपयोग संघटनेच्या हिताच्या दृष्टीने करून सदस्यांचे हित साधने हा आहे असे मत डॉ.इंगोले यांनी व्यक्त केले. आगामी काळात संघटनेच्या सदस्यांकारिता, प्रश्नाकरिता लढत राहून आणी संघटनेला बळकट करू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

उपाध्यक्षपदाच्या बिनविरोध निवडीबद्दल डॉ.इंगोले यांनी संघटनेचे अध्यक्ष डॉ.संतोष कुलकर्णी, डॉ.मंजुषा गिरी डॉ.शिवकुमार उत्तुरे, डॉ.अनिल पाचनेकर, डॉ.राजेंद्र कुलकर्णी, डॉ.काटकर, डॉ.जयेश लेले डॉ.संजय कदम, डॉ.संजय पाटील, डॉ.सुनील इंगळे, डॉ. संतोष कदम, डॉ.मंगेश पाटे, डॉ.अर्चना पाटे, डॉ.अबास जबिले, डॉ.रमेश भराटे, डॉ.विक्रांत देसाई, डॉ.अमोल गित्ते, डॉ.अनिल बारकूल, डॉ.अनुपम टाकळकर, डॉ.यशवंत गाडे यांचे आभार मानले. डॉ.राजेश इंगोले यांच्या यांच्या निवडीचे संपूर्ण महाराष्ट्रासह अंबाजोगाईतून जल्लोषात स्वागत करण्यात आले.

---



# 'ज्ञानोबा–तुकाराम'च्या जयघोषाने दुमदुमला नागापूर परिसर!

## आषाढी एकादशीनिमित्त संत तुकाराम विद्यालयात पारंपरिक दिंडीचा भक्तिमय सोहळा

**नागापूर कॅम्प (प्रतिनिधी):**

"ज्ञानोबा-तुकाराम... पुंडलिक वरदा हरी विठ्ठल... जय जय रामकृष्ण हरी..." या अखंड नामघोषाने शुक्रवारी नागापूर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त संत तुकाराम विद्यालय, नागापूर कॅम्प येथे आयोजित करण्यात आलेल्या पारंपरिक दिंडी सोहळ्याने अवघा परिसर जणू पंढरीमय झाला. ही दिंडी नागापूर व कॅम्प या मार्गे निघाली. दिंडी नागापूर येथील प्रसिद्ध नागनाथ मंदिर येथून सर्व गावांमध्ये फिरवण्यात आली. गावातील महिला व पुरुषांनी दिंडीचे दर्शन घेतले तसेच गावकऱ्यांनी दिंडीला उस्फुर्त सहभाग दिला.

डोक्यावर तुळशी वृंदावन, हातात टाळ-मृदंग, भगव्या पताका आणि मुखी विठ्ठलनामाचा अखंड गजर... अशा वारकरी परंपरेचे दर्शन घडविणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दिंडीने उपस्थितांची मने जिंकली. विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज तसेच वारकरी यांच्या आकर्षक वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी साकारलेले भक्तिमय दृश्य पाहून उपस्थितांना "अवघे पंढरपूर नागापूरमध्ये अवतरले" अशी अनुभूती मिळाली.

टाळ-मृदंगाच्या निनादाने आणि हरिनामाच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. दिंडी मार्गावर नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत विद्यार्थ्यांचे स्वागत केले. अनेकांनी दिंडीचे कौतुक करत भारतीय संस्कृती आणि वारकरी परंपरेचे जतन करणारा हा उपक्रम प्रेरणादायी असल्याची भावना व्यक्त केली.

या दिंडीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये संतपरंपरेचे विचार, भक्ती, समता, संस्कार, सामाजिक ऐक्य आणि भारतीय संस्कृतीविषयी अभिमान निर्माण करण्याचा संदेश देण्यात आला. विद्यालयाचा हा उपक्रम विद्यार्थ्यांसह पालक आणि ग्रामस्थांसाठीही अविस्मरणीय ठरला.

---





# गाढे पिंपळगावच्या एकाच कुटुंबातील तीन अपत्यांचे 'नीट'मध्ये घवघवीत यश; परळीत सत्कार!

**परळी वैजनाथ प्रतिनिधी**

जिद्द, मेहनत आणि चिकाटीच्या बळावर ग्रामीण भागातील मुलांनी अभूतपूर्व यश संपादन केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथील एका सर्वसामान्य अल्पभूधारक शेतकरी कुटुंबातील जुळे भाऊ आणि बहिणीने वैद्यकीय प्रवेश परीक्षेमध्ये (NEET) भरघोस गुण मिळवून यश संपादन केले आहे. या यशाबद्दल परळी येथे नगरसेवक अश्विन मोगरकर, पत्रकार बांधव व फुटके परिवाराच्या वतीने या गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा शाल, पुष्पगुच्छ आणि पेढे भरवून सत्कार करण्यात आला.

गाढे पिंपळगाव येथील अल्पभूधारक शेतकरी केशव राडकर यांची मुले अजय, विजय आणि मुलगी क्रांती या तिघांनीही नुकत्याच घोषित झालेल्या 'नीट' (NEET) परीक्षेच्या निकालात नेत्रदीपक यश मिळवले आहे. विशेष म्हणजे, राडकर यांचा एक मुलगा आधीपासूनच एमबीबीएस (MBBS) चे शिक्षण पूर्ण करत आहे. आता या तिघांच्या यशामुळे एकाच घरातील चार बहिण-भाऊ डॉक्टर होणार असून, मराठवाड्यातील हे अत्यंत दुर्मिळ आणि अभिमानास्पद उदाहरण ठरले आहे.

या दैदिप्यमान यशाची दखल घेत परळी येथे विशेष सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे जिल्हाध्यक्ष संगमेश्वर फुटके, सेवानिवृत्त शिक्षक भिमाशंकर फुटके, बसलिंग फुटके, चंद्रशेखर फुटके, प्रा. प्रविण फुटके, नगरसेवक अश्विन मोगरकर, संपादक मोहन व्हावळे, 'दिव्य मराठी'चे तालुका प्रतिनिधी धनंजय आढाव, 'झुंजार नेता'चे तालुका प्रतिनिधी प्रकाश चव्हाण, नितीन घेवारे, श्री. सोनवणे, महेश घेवारे यांच्यासह फुटके परिवारातील सौ. सुक्षला फुटके, सौ.आशा फुटके, प्राचार्या सौ सुजाता फुटके सौ.प्राची फुटके, सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कठीण परिस्थितीवर मात करत राडकर परिवारातील मुलांनी मिळवलेल्या या यशामुळे संपूर्ण तालुक्यातून आणि जिल्ह्यातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.